**महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम-२०१५ अंतर्गत लोकसेवा, नियत कालमर्यादा, पदनिर्देशित अधिकारी, प्रथम व द्वितीय अपिलीय प्राधिकारी अधिसूचित करण्यात आल्याबाबत निर्गमीत केलेल्या अधिसूचनेची अंमलबजावणी करणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**ग्राम विकास विभाग**
**शासन निर्णय क्रमांकः आरटीएस-२०१८/प्र.क्र.१४५/आस्था.५**
बांधकाम भवन, २५ मर्झबान रोड,
फोर्ट, मुंबई - ४०० ००१
दिनांक :- १३ फेब्रुवारी, २०१९.

<u>वाचा</u> : १) महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम-२०१५, दिनांक २८ एप्रिल, २०१५
२) शासन निर्णय क्रमांकः आरटीएस-२०१५/प्र.क्र.३२/पं.रा-५ दिनांक १४ जुलै, २०१५

<u>**प्रस्तावना :**</u>

महाराष्ट्र लोकसेवा हक्क अध्यादेश-२०१५ च्या कलम-३ अनुसार अधिसूचित करावयाच्या सेवा, पदनिर्देशित अधिकारी, प्रथम व द्वितीय अपिलीय प्राधिकारी आणि नियत कालमर्यादा याबाबतची अधिसूचना दिनांक १० जुलै, २०१५ रोजी निर्गमित करण्यात आली आहे. सदर अधिसूचनेन्वये ग्रामपंचायत पातळीवरील १३ लोकसेवांच्या संदर्भातील पदनिर्देशित अधिकारी, प्रथम व द्वितीय अपिलीय अधिकारी आणि नियत कालमर्यादा निश्चित करण्यात आली आहे. अधिसूचित करण्यात आलेल्या १३ सेवा या पात्र व्यक्तींना उपलब्ध करुन देण्याकरीता ऑनलाईन कार्यप्रणाली कार्यान्वित असेल, त्या ठिकाणी सदर सेवा संगणकीकृत प्रतींद्वारेही देण्यात येते व ज्या ठिकाणी ऑनलाईन प्रणाली कार्यान्वित नाही, त्या ठिकाणी सदर सेवा संदर्भिय शासन निर्णयासोबत जोडलेल्या विहित नमुन्यांमध्ये उपलब्ध करुन देण्यात येते. सद्यस्थितीत या विभागाने दिनांक१० जुलै, २०१५ च्या अधिसूचनेन्वये अधिसूचित केलेल्या १३ सेवांपैकी १० सेवा महाराष्ट्र शासनाच्या आपले सरकार पोर्टलवर ऑनलाईन उपलब्ध करुन देण्यात आलेल्या आहेत. यासंदर्भात आढावा घेऊन दिनांक १२.२.२०१९ च्या अधिसूचनेन्वये महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम-२०१५ अंतर्गत १३ ऐवजी ७ लोकसेवा विहित कालमर्यादेत देण्याचे निश्चित केले आहे.

<u>**शासन निर्णय :**</u>

या विभागाच्या प्रशासकीय अधिपत्याखाली राज्यातील सर्व ग्रामस्थांसाठीच्या ज्या सेवा महत्वाच्या आहेत अशा लोकसेवांची निश्चिती करण्यात आली आहे. त्यास अनुसरुन महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम-२०१५ च्या कलम-३(१) अनुसार अधिसूचित करावयाच्या सेवा,

पदनिर्देशित अधिकारी, प्रथम व द्वितीय अपिलीय प्राधिकारी आणि नियत कालमर्यादा याबाबतची अधिसूचना दिनांक १२.२.२०१९ रोजी निर्गमित करण्यात आली आहे. लोकसेवा हक्क अध्यादेश-२०१५च्या अनुषंगाने अधिसूचित करण्यात आलेल्या सेवांबाबतची अंमलबजावणी करण्याच्यासंदर्भात उक्त दिनांक १४ जुलै, २०१५ च्या शासन निर्णयान्वये निर्गमित केलेल्या मार्गदर्शक सूचना दिनांक १२.२.२०१९ रोजी निर्गमित केलेल्या अधिसूचने-तील लोकसेवांकरिताही लागू राहतील.

त्याचप्रमाणे महसूल व वन विभागाकडून महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम २०१५ अंतर्गत देण्यात येणाऱ्या सेवांमध्ये "तात्पुरते रहिवास प्रमाणपत्र" ही सेवा देण्यात येत असल्याने या विभागाकडून रहिवाशी दाखला देण्याची आवश्यकता नाही. तसेच (१) विधवा असल्याचा दाखला - यासाठी नवऱ्याच्या मृत्यु नोंद दाखल्यासोबत पुनर्विवाह न केल्याचे स्वघोषणापत्र घेण्यात यावे. (२) परितक्त्या असल्याच्या दाखला - यासाठी मा.न्यायालयाचे अथवा सक्षम प्राधिकाऱ्याचे आदेशासोबत नवऱ्याने सोडल्याचे/ नवऱ्यास सोडल्याचे स्वघोषणापत्र घेण्यात यावे. (३) विभक्त कुटुंबाचा दाखला, (४) नोकरी व्यवसायासाठी ना हरकत प्रमाणपत्र, (५) बेरोजगार प्रमाणपत्र, (६) हयातीचा दाखला, (७) शौचालय दाखला, (८) नळजोडणीसाठी अनुमती प्रमाणपत्र, (९) चारित्र्याचा दाखला, (१०) वीजेच्या जोडणीसाठी ना-हरकत प्रमाणपत्र, (११) जिल्हापरिषद फंडातून कृषी साहित्य खरेदी, (१२) राष्ट्रिय बायोगॅस व खत व्यवस्थापन कार्यक्रम, (१३) बचतगटांना खेळते भागभांडवल बँकेमार्फत कर्ज पुरवठा, (१४) कोणत्याही योजनेचा लाभ न घेतल्याचे प्रमाणपत्र (१५) निराधार योजनेसाठी वयाचा दाखला देण्याच्या सेवा यापुढे बंद करण्यात येत असून यासंदर्भाने ग्रामस्थांकडून सोबत जोडलेल्या नमुन्यातील स्वयंघोषणापत्र स्वीकारण्यात यावे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेताक क्रमांक २०१९०२१३१४५०२८७०२० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

**( पं. खं. जाधव )**
उप सचिव, महाराष्ट्र शासन

**प्रत,**

१. मा.विरोधी पक्षनेते, विधान परिषद व विधानसभा, महाराष्ट्र विधानमंडळ, मुंबई
२. सर्व सन्माननीय विधानपरिषद / विधानसभा सदस्य व संसद सदस्य
३. मा.राज्यपाल महोदय यांचे सचिव
४. मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव

५. सर्व मा.मंत्री/राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव
६. मा.राज्य निवडणूक आयोग यांचे कार्यालय
७. मा.मुख्य सचिव यांचे उपसचिव
८. अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव, सर्व मंत्रालयीन विभाग
९. सर्व विभागीय आयुक्त
१०.सर्व जिल्हाधिकारी
११.सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद
१२.सर्व मंत्रालयीन विभाग
१३.ग्राम विकास विभागातील सर्व कार्यासने
१४.निवड नस्ती (कार्यासन आस्था. ५), ग्रामविकास विभाग.

(ज्या दाखल्यासाठी स्वघोषणापत्राद्वारे मजकूर जाहीर करावयाचा आहे, त्या स्वघोषणापत्रातील शेवटचा परिच्छेद खालीलप्रमाणे नमूद करावा.) स्वयंघोषणापत्र

अर्जदाराचा फोटो

स्वयंघोषणापत्र

मी ----------------------------- श्री. ------------------------------------------ यांचा मुलगा / मुलगी वय ------ वर्षे, आधार कार्ड क्रमांक. (असल्यास) --------------------- व्यवसाय ------------------------ राहणार ------------------------------------------- याद्वारे घोषित करतो / करते की, वरील सर्व माहिती माझ्या व्यक्तिगत माहिती व समजूतीनुसार खरी आहे. सदर माहिती खोटी आढळून आल्यास, भारतीय दंड संहिता अन्वये आणि / किंवा संबंधित कायद्यानुसार माझ्यावर खटला भरला जाईल व त्यानुसार मी शिक्षेस पात्र राहीन . तसेच सदर स्वयंघोषणापत्राद्वारे मला मिळालेले सर्व लाभ सर्वंकषरित्या काढून घेण्यात येतील, याची मला पूर्ण जाणीव आहे.

ठिकाण : ------------------------ अर्जदाराची सही : ---------------------------

दिनांक : ------------------------- अर्जदाराचे नांव : ----------------------------

(The written declaration as given hereunder will be included at the end of the application form for seeking services.)

| Applicant's Photo |
|---|

Self-Declaration

I _________________ Son/Daughter of ____________________________ aged ___, occupation _______________ resident of ______________________ with UID No. ________________________ hereby declare that the information provided above above is true and correct to the best of my personal knowledge, information and belief. I fully understand the consequences of giving false information. If the information is found to be false. I Shall be liable for prosecution and punishment under Indian Penal Code and / or any other law applicable thereto. Also all the benefits availed by me shall be summarily withdrawn.

Place : _______________ Applicant's Signature _____________

Date : ________________ Applicant's Name :________________